**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि.**

**दिनांक : 08.06.2024** **शनिवार**

---

**ठळक बातम्या**

1) **रालोआच्या संसदीय पक्षाच्या नेतेपदी नरेंद्र मोदी यांची निवड,सलग तिसऱ्यांदा देशाच्या पंतप्रधानपदाची उद्या शपथ घेणार.**
2) **एनडीएच्या माध्यमातून सशक्त, स्थिर आणि विकासोन्मुख सरकार स्थापन होईल – मोदी यांचा विश्वास.**
3) **रिझर्व बँकेच्या पतधोरण आढाव्यात प्रमुख व्याजदर कायम.**

**आणि**

4) **मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला येत्या १५ जूनपासून प्रारंभ; मुंबई, पुण्यासह देशभरात ५ ठिकाणी चित्रपटांचं प्रदर्शन.**

**शपथविधी**

राष्ट्रीय लोकशाही आघाडी म्हणजेच NDAच्या संसदीय पक्षाचे नेते नरेंद्र मोदी, सलग तिसऱ्यांदा देशाच्या पंतप्रधान पदाची शपथ घेणार आहेत. उद्या संध्याकाळी सहा वाजता, हा शपथविधी समारंभ होणार असून त्यांच्यासह मंत्रिमंडळाचाही शपथ विधी होण्याची शक्यता आहे. नरेंद्र मोदी यांनी काल संध्याकाळी राष्ट्रपती भावनात जावून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली. सरकार स्थापनेचा दावा सादर केल्यानंतर राष्ट्रपतींनी त्यांना सरकार स्थापन करण्याचं निमंत्रण दिलं असून मंत्रिमंडळ सहकाऱ्यांची यादी सादर करण्यास सांगितलं आहे. राष्ट्रपती भवनाबाहेर मोदी यांनी वार्ताहरांना ही माहिती दिली. एनडीएच्या माध्यमातून एक सशक्त, स्थिर आणि विकासोन्मुख सरकार स्थापन होईल असा विश्वास मोदी यांनी व्यक्त केला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्याला दिलेल्या राज्यघटनेतली मूल्यं जपण्यासाठी आपल्या आयुष्याचा प्रत्येक क्षण समर्पित असल्याचं प्रतिपादन नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. अठराव्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर पंतप्रधान पदावर विराजमान होणारे ते 15वे व्यक्ती आहेत.

**संसदीयपक्ष बैठक**

तत्पूर्वी राष्ट्रीय लोकशाही आघाडी म्हणजेच NDAच्या संसदीय पक्षाच्या नेतेपदी भाजपाचे नेते, नरेंद्र मोदी यांची निवड करण्यात आली. NDAच्या संसदीय पक्षाची बैठक, काल दुपारी नवी दिल्लीतल्या जुन्या संसदेच्या अर्थात संविधान भवनाच्या मध्यवर्ती सभागृहात झाली. त्यावेळी भाजपचे ज्येष्ठ नेते राजनाथ सिंह यांनी, NDAच्या संसदीय पक्ष नेतेपदी मोदी यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला. या प्रस्तावला अमित शहा, नितीन गडकरी आणि तेलगू देसम पक्षाचे प्रमुख चंद्राबाबू नायडू, संयुक्त जनता दलाचे अध्यक्ष आणि बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार,

शिवसेनेचे नेते आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राष्ट्रवादीचे नेते आणि  राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, लोक जनशक्ती पक्षाचे प्रमुख चिराग पासवान, राष्ट्रीय लोकदल प्रमुख जयंत चौधरी, जनसेना प्रमुख पवन कल्याण, अपना दलच्या नेत्या अनुप्रिया पटेल, जनता दलाचे नेते एचडी कुमारस्वामी या नेत्यांनी या प्रस्तावला अनुमोदन दिलं तर NDAच्या सर्व घटक पक्षांनी पाठिंबा दिला. यावेळी बोलताना नायडू म्हणाले की, मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली एनडीए सरकारनं गेल्या दहा वर्षांत महत्त्वपूर्ण पावलं उचलली असून देशानं उल्लेखनीय प्रगती आणि परिवर्तन पाहिलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्यावर विश्वास दाखवल्या बद्दल सर्वांचे आभार मानताना आपल्या आघाडीच्या आगामी दहा वर्षांच्या रूपरेषेबाबत भाष्य केलं. तसंच तंत्रज्ञनाला कायम नाकरणाऱ्या विरोधकांनी आपल्यावर टीका करण्यासाठी देशाच्या प्रतिष्ठेला धक्का देणारा खोटा प्रचार केल्याचं मोदी म्हणाले. आता पुढील पाच वर्षे मतदान यंत्रांवर टीका होणार नाही, आपल्या आघाडीचं नाव बदलून निवडणुकांना सामोरं गेलेल्या विरोधकांना जनतेनं संधी नाकारली असल्याचं मोदी म्हणाले. एनडीएच्या नेतेपदी निवड झाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाजपचे मार्गदर्शक लालकृष्ण अडवाणी आणि मुरली मनोहर जोशी, माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांची निवासस्थानी जावून भेट घेतली.

**पतधोरण**

रिझर्व्ह बँकेची २०२४-२५ या आर्थिक वर्षातील पतधोरण समितीची दुसरी बैठक काल संपली; त्यानंतर गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी द्वैमासिक पतधोरण जाहीर केलं. त्यानुसार प्रमुख व्याज दरात कोणताही बदल करण्यात आलेला नाही; त्यामुळे रेपो दर साडे सहा टक्क्यांवर कायम राहणार आहे. सलग आठव्यांदा रिझर्व बँकेनं व्याजदर कायम ठेवले आहेत. रिझर्व्ह बँकेने आर्थिक विकास दराचा अंदाज 7 टक्क्यांवरून 7 पूर्णांक 2 टक्के केला आहे. तसंच या आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत 7 पूर्णांक 2 टक्के विकास दराचा अंदाज व्यक्त केला आहे.

**मुंबई कोकण पदवीधर**

कोकण पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीतून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनं माघार घेतली आहे. पक्षाकडून अभिजीत पानसे यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली होती. पण काल अर्ज दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी त्यांनी अर्ज न भरण्याचा निर्णय घेतला. या निवडणुकीसाठी शिवसेनेचे संजय मोरे आणि भाजपाचे निरंजन डावखरे रिंगणात आहेत. मुंबई पदवीधर मतदारसंघासाठी भाजपचे उमेदवार किरण शेलार यांनी काल उमेदवारी अर्ज दाखल केला. विधान परिषदेच्या नाशिक विभागीय शिक्षक मतदार संघासाठी शिवसेना उध्दव ठाकरे गटाच्या वतीनं ॲड संदीप गुळवे तर शिवसेना शिंदे गटाच्या वतीनं विद्यमान आमदार किशोर दराडे यांनी काल अर्ज दाखल केले. विशेष म्हणजे महायुतीकडून किशोर दराडे यांचा अर्ज असताना राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाकडून महेंद्र भावसार तर महाविकास आघाडीत उध्दव ठाकरे गट निवडणूक लढवत असताना काँग्रेस पक्षाचे दिलीप पाटील यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

**या प्रादेशिक बातम्या आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात.**

**मिफ-मुंबई**

अठरावा मिफ (MIFF) अर्थात मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव येत्या १५ ते २१ जून दरम्यान होणार आहे. या महोत्सवात ५९ देशांचे ३१४ चित्रपट प्रदर्शित केले जातील. “अमृतकाळातला भारत”; ही, यंदाच्या या महोत्सवाची विशेष संकल्पना आहे, असं, माहिती आणि प्रसारण सचिव संजय जाजू यांनी काल नवी दिल्लीत

वार्ताहर परिषदेत सांगितलं. हा महोत्सव मुंबईत होणार असला तरी पुण्यासह दिल्ली, चेन्नई, आणि कोलकातामध्ये चित्रपटांचं प्रदर्शन केलं जाईल. पंधरा जूनला मुंबई, दिल्ली, कोलकाता, पुणे आणि चेन्नई इथं,बिली अँड मॉली, अँड ऑटर लव्ह स्टोरी, या चित्रपटानं महोत्सवाची सुरुवात होणार आहे. विविध देशांचे सतरा चित्रपट, तसंच तज्ञांचे परिसंवादही या महोत्सवात होणार आहेत.

**सौरऊर्जा Byte**

महावितरणच्या राज्यभरातील विद्युत वाहन चार्जिंग स्थानकांना सौर ऊर्जा प्रकल्पांद्वारे वीजपुरवठा करण्यात येणार आहे. या नियोजनातील पहिला प्रकल्प पुण्यात गणेशखिंड इथ नुकताच कार्यान्वित झाला. महावितरणच्या प्रकाशभवनच्या छतावर ६० किलोवॅटच्या सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पाद्वारे त्याच ठिकाणी असलेल्या विद्युत वाहन चार्जिंग स्थानकांना वीजपुरवठा सुरु करण्यात आला आहे. ऐकुया या विषयी अधिक माहिती महावितरणचे मुख्य अभियंता राजेंद्र पवार यांच्याकडून.

**Byte** *पुणे परिमंडळात महावितरण तर्फे 18 ठिकाणी इलेक्ट्रिकल व्हेयिकल चार्जिंग स्टेशन उभारण्यात आलेले आहे. हरित ऊर्जा धरण राबवणे व त्याचे महत्त्व जनतेला पटवून देणे या उद्देशाने भारतातील पहिले सौर उर्जेवर चालणारे विविध चार्जिंग स्टेशन पुणे येथील महावितरणच्या प्रकाश भवन परिसरात उभारण्यात आले असून नुकतेच त्याचे लोकार्पण करण्यात आले आहे. या प्रकल्पाच्या किलोवॅट इतकी आहे, याच धर्तीवर इतर ठिकाणच्या चार्जिंग स्टेशनला हरित ऊर्जेवर चालवण्यासाठी पुढील प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.*

**खरीप हंगाम**

कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी काल कृषी विभागाच्या सचिवांसह सर्व प्रमुख अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करून खरीप हंगामाच्या नियोजनाचा आढावा घेतला. यावर्षी खरिपाच्या क्षेत्रात एक लाख दहा हजार हेक्टरनं वाढ झाली असून बियाण्यांच्या आणि खतांच्या पुरवठ्याबाबत सूक्ष्म नियोजन केले जात असून सध्याची बियाणे मागणी ही 18 लाख मेट्रिक टन इतकी आहे; वाढलेल्या क्षेत्राचा विचार करून राज्य शासनाने सर्व बियाणे मिळून 24 लाख मेट्रिक टन बियाणे मंजूर केले आहे. त्यापैकी 13 लाख मेट्रिक टन वितरित केले असून आणखी 6 लाख वितरणाच्या स्थितीत आहे तर उर्वरित बियाणे देखील वेळेत वितरीत केलं जाईल, असे नियोजन केले जात असल्याचं मुंडे यांनी स्पष्ट केले.

**सिंहस्थ**

नाशिकमध्ये आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या नियोजनात सध्या असलेला शाही मार्ग हा बारा मीटर करण्याचा विचार महापालिका प्रशासनानं सुरू केला आहे. आयुक्त डॉ. विजय करंजकर,अतिरिक्त आयुक्त चौधरी, शहर अभियंता आणि इतर विभागांचे प्रमुख अधिकारी यांनी सिंहस्थ कामांमध्ये कोण कोणती कामे प्राधान्यानं हाती घेणे आवश्यक आहे तसच कोणती कामे अतिआवश्यक आहेत यादृष्टीनं पाहणी केली आहे.

**एसटीयुपीआय**

राज्य परिवहन महामंडळानं प्रवाशांना युपीआय प्रणालीद्वारे तिकीट खरेदी करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. याला प्रवाशांनीही उत्तम प्रतिसाद दिला आहे. गेल्या पाच महिन्यात या माध्यमातून १४ लाख ३२ हजार तिकीटांची विक्री झाली असून एसटीला ३५ कोटी ८७ लाख १५ हजार रुपये उत्पन्न मिळाले आहे.

**नक्षल्यांचं शिबिर**

छत्तीसगड राज्याच्या सीमावर्ती भागात कोरची तालुक्यातील भिमनखोजी गावानजीकच्या जंगलात गडचिरोली पोलिसांनी नक्षल्यांचं शिबिर उदध्वस्त केलं. अपर पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांच्या नेतृत्वात सी-६० पथक आणि केंद्रीय राखीव दलाच्या जवानांनी गुरुवारी संध्याकाळी हे नक्षलविरोधी अभियान राबवलं.

**पाऊस-रत्नागिरी-सिंधुदुर्ग**

रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात काल पावसानं हजेरी लावली. येत्या दोन तीन दिवसात वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज असल्याने मच्छिमार आणि इतर नौकाधारकांनी खाडी क्षेत्रात आणि समुद्रात जाऊ नये अशा सूचना करण्यात आल्या आहेत.

**हवामान**

सांगली जिल्ह्यात काल रात्री वादळी वारा आणि वीजांसह जोरदार पाऊस झाला. वादळी वाऱ्यामुळं काही ठिकाणी विद्युत पुरवठा खंडित करण्यात आला होता. सांगलीत पाटबंधारे विभागाच्या कार्यालयात मध्यवर्ती पूर नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे. दक्षिण कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात आज जोराचे वारे आणि वीजांसह मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरच प्रादेशिक बातमी पत्र संपलं, नमस्कार**